म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. २९८

१८८५

इतिहास
५३५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
इतिहास

संग्रहालय क्रमांक
२९८

लेखक काशिनाथ ना. साने

सन १८८५

पुस्तकाचें नांव खर्ड्याच्या स्वारीची बखर

संग्रहालय ठाणे,

[काव्येतिहास-संग्रह]

१५.

# खरड्याच्या स्वारीची बखर.

ही

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या

टीपांसह

काशिनाथ नारायण साने, बी. ए. (डेक्कन कॉलेज.)

यांणीं

प्रकाशित केली.

---

यावे दुनादि खळांतें श्रीमाधवराव पेशवे दमुनी ।
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश वेद मुनी ॥
मोरोपंत.

---

शालिवाहन शके १८०७——राज्याभिषेक शके २११.

७८
१८५

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परम प्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथप्रकाशक.

श्रीगजानन.

# खड्याच्या स्वारीची बखर.

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीमंतसकलगुणालंकरण अखंडित–लक्ष्मी अलंकृत राजश्री कैलासवासी माधवराव नारायण पेशवे यांची बखर. खड्यांची स्वारी व्हावयाचें कारण काय तें सविस्तर लिहिलें आहे, त्याजवरून निवेदन करावें. त्याजवरून लिहिलें जे:––त्या वेळेस हरीपंत फडके व महादजी शिंदे कैलासवासी जाहले होते, व नाना फडणीस श्रीमंतांजवळ कारभारी एकटे होते, व श्रीमंत त्या वेळेस लहान होते; अशी संधी पाहून हैदराबादेस निजाम अल्ली मोंगल रहात होते, त्याजपाशीं दिवाण मश्रुलमुलूख म्हणोन रहात होते, त्यांजला किताब मैनातदवला असा होता, त्याणीं निजामअल्लीस समजाविलें कीं, "या वेळेस पेशव्यांवर स्वारी केली असतां राज्य हातीं लागेल किंवा पेशवे यांजवळून खंडणी घेतली असा नक्षा होईल." असें समजाविलें. त्यांचे मनांतून स्वारी करावयाचा बेत नवता, परंतु दिवाण याचा आग्रह फार पडला. तेव्हां निजामअल्ली यांणीं सांगितलें कीं, तुमची मर्जी असल्यास स्वारीची तयारी करावी. त्याजवरून त्यांणीं लाख फौज तयार केली, आणि बाहेर डेरे देऊन निजामअल्ली व मश्रुलमुलूख व त्याचे सरदार उमराव सुद्धां डेऱ्यास जाऊन उतरले. आणि पेशव्यांचे तर्फेनें रा० गोविंदराव कृष्ण काळे वकील तेथें होते त्यांस बलावून आणून सांगितलें कीं, "आमचा बेत पुण्यावर स्वारी करावयाचा आहे. तुम्हीं लिहून पाठवावें. खंडणी द्यावयाची मर्जी असल्यास लिहून आणवावें, अथवा खासा स्वारी निघावयाची असल्यास तसेंच लिहून आणवावें." त्याजवरून वकिलांनीं उत्तर दिलें कीं, "आमची

१. ह्या प्रकरणाच्या दोन प्रती आह्मांकडे आल्या. एक मालवण येथील रा० दिनकर गोविंद वझे यांजकडून व दुसरी महाड येथील लक्ष्मण विठ्ठल सांकळकर यांजकडून दोन्ही ताडून पाहतां, किरकोळ फरक नजरेस आले, तथापि ह्मणण्यासारखा फरक त्यांत नाहीं. मिळालेल्या प्रती आफलीकडे लिहून घेतलेल्या आहेत—एक मोडींत व दुसरी देवनगरींत. मूळ प्रकरण केव्हां लिहिलें गेलें तें समजत नाहीं. सांकळकर ह्मणतात त्यांस ही बखर आलीबाग तालुक्यांत एका आगऱ्याच्या घरीं मोडींत लिहिलेली सांपडली व तिजवरून त्यांणीं नागरी लिपींत तयार केली. वझे यांणीं आपल्या प्रतीची हकीकत दिली नाहीं.

२. शिंदे व फडके हे इ० स० १७९४ सालीं सुमारें ४॥ महिन्याच्या अंतरानें वारले.

३. हे बारामतीकर.

लिहिलीं मागें गेलीं आहेत व पुढेंही जातील. आमचें लिहिलें गेल्यानेंच उत्तर येईल असा अर्थ नाहीं. आपण आपले येथील वकील पुणें मुक्कामीं समक्ष पाठवावे, म्हणजे उत्तर होणें तें होईल."

त्याजवरून त्याणीं तेथून वकील नेमले. ते कोण कोण म्हणाल तरि त्यांचीं नांवें, रेणुराव म्हणोन ब्राम्हण होता त्यास किताब राणे रायाधीश असा होता. व मीर अलम म्हणोन पठाण होता. हे दोनै वकील नेमले. त्यांजबरोबर फौज पांच हजार दिली, व दहा पांच हत्ती बरोबर दिले. वकील रवाना केले ते एक महिन्यानें पुणें मुक्कामीं आषाढाचे महिन्यांत आले. दिवस परजन्य काळचे. पुण्यांत घाशीराम कोतवाल याचे तळ्यावर उतरले. राजश्री नाना फडणीस वकिलांस सामोरे एक कोश गेले. तेथें भेटी त्यांच्या व यांच्या जाहल्या. सन्मानही बहुत केला. त्यांस बरोबर घेऊन सरकारवाड्यांत श्रीमंताकडेस आले. भेटी जाहल्या. नंतर त्यांजला उतरावयास ठिकाणें दिलीं. पहिले दिवशीं बोलणें कांहींच जाहलें नाहीं. शनवारांत वाडा राजश्री सखाराम बापू यांचा होता. तेथें मिरअलम पठाण यांस उतरावयास सांगितलें. व चौकांत वाडा बारामतीकर यांचा होता, तेथें रेणुराव यांस उतरावयास सांगितलें. दोघे दोहीं वाड्यांत जाऊन वकील उतरले.

पूर्वीं घाशीराम कोतवाल यासि मारिलें होतें. या वेळेस कोतवाल आनंदराव काशी होते. त्यांजला बलावून आणून सांगितलें कीं, "रस्त्याच्या फरसबंद्या बारीक आहेत त्या मोठ्या चिरेबंदी कराव्या. रस्ते दररोज झाडीत जावे. वकिलांस दररोज वाड्यांत यावें जावें लागतें." त्याजवरून कोतवाल यांणीं रस्त्याचा बंदोबस्त केला.

नंतर आठां चहूं दिवशीं वकील यांणीं वाड्यांत विनंती करावयास कारकून पाठविला कीं, आज आम्हांस वाड्यांत यावयाचें आहे. त्याजवरून रात्रीं मार्गीं चंदनाचे सडे घालून, हवया, नळे, चंद्रज्योती लावून, मोठा इतमाम करून, वकिलांस वाड्यांत आणिलें. तेथें व्यंकट नरसींचा नाच चार घटिका जाहला. नंतर वकील यांणीं विनंती केली कीं, "निजाम अली शेहराबाहेर येऊन कोसभर उतरले आहेत आणि तेथून आमची रवानगी जाहली आहे. खंडणी द्यावयाची मर्जी असल्यास तसेंच लिहून पाठवावें, अथवा खांसा स्वारी बाहेर निघावयाची

४. "मीर अलम्, रघोराम हैबतराव राव राजेंद्र, व रेणुराव धोंडजीराव रायराय, असे त्रिवर्ग रवाना केले." पेशव्यांची बखर, पृष्ठ १७७ पहा.

५. व्यंकट नरसी हा उत्तम गवय्या होता.

६. हैदराबाद शहराबाहेर.

असल्यास तशीच आज्ञा व्हावी." या प्रमाणे वकील यांणीं जबरीचा जाबसाल केला. त्याजवरून नानांनीं उत्तर दिलें कीं, "तुम्हीं आलां तें आम्हांस समजलें, परंतु महाराजांस पक्कें समजलें नाहीं. एकांतीं महाराजांस विनंती करितों." ऐसा जाब सांगितला. त्याजवरून वेकील उठोन गेले. कारण परजन्य काळचे दिवस, चातुरमास सरला पाहिजे, म्हणून लांबणीवर घालावयाचा बेत.

त्याजवर पंधरा दिवशीं वकील यांस वाडयांत मेजवानी केली. व खलबतही चार घटिका जाहलें. नंतर श्रीमंतांनीं उत्तर दिलें कीं, तुम्हीं आलां तें आम्हांस समजलें, परंतु आमचे पेशव्यांचे घरीं उच्छाह दोन, यांत श्रावण मासचा मोठा श्रीकाशी रामेश्वरापासून शास्त्री, पंडित, वैदिक, ब्राम्हण मिळाले आहेत. त्यांच्या संभावना, बैठका व परीक्षा व्हावयाच्या. सध्या आम्हांस उत्तर होत नाहीं. उत्साह झाल्या नंतर निक्षूण उत्तर सांगूं." त्याजवरून वकील उठोन गेले. इकडे निजाम अल्ली मोंगल बाहेर निघाले होते, शह देऊन मात्र बैसले होते, भय प्रदेश कांहीं खंडणीचें बोलणें बोलतील.

इकडे दुसरे दिवशीं नानांनीं नागपूरवाले रघोजी भोंसले त्यांचे वकील राजश्री नारायणराव वैद्य पुण्यास होते, त्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, "तुम्हीं नागपुरास जावें, आणि भोंसले यांस सांगावें कीं, श्रीमंत खांसा स्वारी दसऱ्याच्या मुहुर्तें बाहेर निघणार, तुम्हीं आपली फौज सुद्धां निघोन यावें, निजाम अल्ली याजवर मोहीम आहे." दौलतराव शिंदे गंगेचे कांठीं होते, त्यांचे कारभारी बाळोबा पागनीस पुण्यांत होते. त्यांस सांगितलें कीं, "तुम्हीं दौलतराव यांस लिहावें कीं, तुम्हीं आपले सरदार जिवबादादा व लखोबा नाना व कंपु हिंदुस्थानांत आहेत त्यांस आणवावे म्हणोन लिहावें. तुम्हीं आपले फौजेची तयारी करावी" याप्रमाणें सांगितलें. व होळकर व मिरजकर व गायकवाड व पवार व विंचूरकर व राजे बहादर असे सरमजामी बहुत होते. त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं आपले फौजेची तयारी करावी, श्रीमंत खांसा स्वारी दसऱ्याचे मुहूर्तें बाहेर निघणार, निजामअल्ली याजवर मोहीम आहे. त्या वेळेस पुण्यांत फौजा, हुजुरात मानकरी पंचवीस हजार व गारदी पंचवीस हजार एकूण पन्नास हजार बारमासी असे; सरंजामी फौज गरज लागल्यास त्या वेळेस ठेवीत होते. राजश्री नारोपंत चक्रदेव, फडके यांचे कारभारी, यांस नानांनीं बलावून आणून सांगितलें, तुम्हीं पुण्यांत हुजुरपागा आहेत, त्यांची हैजेरी आमचे वाडयांत बसोर्न दररोज घेत जावी. आज या पागेची उद्यां दुसऱ्या पागेची अशा बावन्न पागा, त्यांच्या हजेऱ्या रोजचे रोज घेत जाव्या."

७. 'बेरीज' पाठभेद. | ८. 'बलावून' पाठभेद.

वकिलांस आविर्भाव दाखविला. पुण्यांत फौज किती आहे हा भ्रम फुटों दिला नाहीं. व नाना आपण बेलबागेंत सकाळचे पालखींत बसोन जात असत, तें जावयाचें ठेविलें, आणि संध्याकाळचे घोड्यावर बसोन बेलबागेंत जाऊं लागले. वकिलांस आविर्भाव दाखविला कीं, पुढें स्वारीचा बेत दिसतो. किरकोळ पागे पतके देशोदेशीं गेले होते, त्यांस पत्र लिहून पाठविलें "दसऱ्यास सर्वांनीं निघून पुण्यास यावें. खांसा स्वारी बाहेर निघणार." याप्रमाणें बंदोबस्त केला.

पुढें श्रावण मासीं उत्साह संपला. नंतर वकिलांची बैठक झाली. तेव्हां वकिलांनीं विनंती केली कीं, "उत्साह संपला आतां आम्हास उत्तर व्हावें." तेव्हां वकिलांस श्रीमंतांनीं उत्तर दिलें कीं, "श्रीगणपतीचा उत्साह आहे तो जहाला म्हणजे दसऱ्याच्या सालाबादी आमच्या ढाला होतच आहेत. सालमजकुरीं आम्हीं खांसा स्वारी बाहेर निघत आहों. तुम्हीं लिहून पाठवावें कीं दरकूच पुढें यावें. समरंगणीं तुमचे आमचे दोन हात होतील, मग तेथें खंडणी द्यावयाची असल्यास देऊं, अथवा जें होणार तें समरंगणीं होईल." याप्रमाणें निक्षून उत्तर दिलें. त्याजवरून वकील यांनीं लिहिलें, दरकूच पुढें यावें.

पुढें दसरा आला. ते दिवशीं नानांनीं रात्रौ श्रीमंतांस सोनें देऊन, आपण एकटेच प्रस्थानीं निघोन गारपिरावर डेरे देऊन उतरले. दुसरे दिवशीं शास्त्री, पंडित व जोशी मेळवून सभा केली. श्रीमंतांस उत्तम मुहूर्त पाहिला. तो नानांचे पाठीमागें पंधरा दिवशीं खांसा स्वारी निघावयाची, तों नानांनीं आपण पुण्यांत येऊन खांसे अंबारीच्या खवासखान्यांत चवरी वारावयास बसोन मोठ्या समारंभानें खांसा स्वारी प्रस्थानीं निघोन गारपिरावर डेऱ्यांत जाऊन उतरले. पूर्वीं पाटीलबावा[१०] यांणीं हिंदुस्थानांतून पाच्छाई यांची स्वारी व वजीरी व नालखी व पालखी माहीमरातेंब[११] आणिली होती, व बहुत दौलत अपरंपार आणिली होती. त्यावेळीं पुण्यांत सोन्याचा धूर निघत होता. सगळे पृथ्वींतील वकील पुण्यास होते. फिरंगी[१२] यांजकडील वकील मालीट म्हणोन होता. सगळे वकिलांस ताकीद जाहली कीं, सर्वांनीं स्वारी बरोबर यावें, पुण्यांत कोणी राहूं नये. त्यावरून वकील मंडळ गारपिरावर येऊन उतरलें. ब्राम्हण मुत्सद्दी पुण्यांत बहुत होते, त्यांस ताकीद झाली कीं, जेवढ्यांस घोडे बसावयास असतील त्यांणीं स्वारी बरोबर यावें. त्याजवरून मुत्सद्दी मंडळी व सरदार व मानकरी व पागे, पतके व लहान मोठे झाडून सरंजामी सुद्धां गारपिरावर डेरे दिला होता तेथें जाऊन उतरले. एक महिना तळ गारपिरावर दिला होता.

९. ढाला=निशाणें. स्वारीस निघणें.
१०. पाटीलबावा=महादाजी शिंदे.
११. मत्स्य वगैरे राजचिन्हें.
१२. फिरंगी=इंग्रज.

तेव्हां नाना बोलले कीं चार सावकार बरोबर असावे. सध्यां पैक्याची गरज आपल्यास नाहीं. समयीं वर्षा सुद्दा महिन्यांनीं छावणी जाहल्यास पैक्याची गरज लागेल. म्हणोन हरिभक्त सावकार यास बलावून आणिले आणि विचारिलें कीं, "तुमचे जवळ आज यावेळेस पैक्याची तयारी किती आहे ?" त्याजवरून त्यांणीं उत्तर दिलें कीं, "यावेळेस ऐशी लक्षांचे तोडे घरांत बांधिलेले आहेत. येण्याजाण्याची अटक पाहिली नाहीं. आठा चहूं दिवसांची मुदत दिली असतां दहा पांच लक्षांची आणखी तयारी होईल." असें उत्तर दिलें. त्याजवरून नाना बोलले कीं, "याप्रमाणें ऐवजाची तयारी आहे कीं काय ?" तेव्हां हरिभक्त बोलले कीं, "कारकून पाठवून मोजदाद करावी म्हणजे खात्री होईल." दुसरे सावकार कर्ण[13] व रास्ते व वाकडे तेथें होते व वानोडे[14] व तांबेकर असे असे बलावून त्यांस विचारिलें कीं, "तुमच्या जवळ आज ऐवजाची तयारी किती आहे ?" तेव्हां कोणी सावकार एक कोट रुपये या वेळेस तयार आहेत असें बोलले, कोणी पाऊण कोट आहेत असें बोलतात, व कोणी सावकार पन्नास लक्ष. असें सावकार बोलूं लागले. तेव्हां नाना बोलले कीं, "आम्हांस गरज लागल्यास पैका घेऊं. स्वारी बरोबर असावें." सावकार यांस पालखीचीं वस्त्रें देऊन, सावकार खुशाल होऊन गारपिरावर येऊन उतरले.

पुण्यांत स्वारी होती त्यावेळेस मनसुबी आली होती. दाभाड्याचे तळेगांवास ब्राम्हणाची बायको शिकिलकर[15] मुसलमान याजकडे जावयास संवकली होती. तेथील ब्राह्मण यांणीं तिचा माग लाविला, आणि पुण्यास येऊन नानांकडे फिर्याद केली कीं, "आज ब्राह्मण्य बुडालें. ब्राह्मणाची बायको शिकिलकर याजकडे जावयास संवकली आहे." तेव्हां नाना म्हणाले तुम्ही सांगता ही गोष्ट कशी घडेल ? तथापि पंचांकडे पंचाईत नेमून दिली. ते पंच कोण कोण म्हणाल तर, बाबा फडके, सदाशिवभट दांते व अन्याबा जुन्नरकर व राघोपंत थत्ते. अशी पांच जणाकडे पंचाईत नेमून दिली. पंचांनीं त्या ब्राह्मणांस व शिकिलकर यास बलावून आणून पंचाईत मनास आणूं लागले. शिकिलकर पैकेकरी होता. त्याणें पंचांस पांच हजार रुपये चारिले. पंचांनीं पैका खाऊन पंचाईत डौलांत अशी आणिली कीं, ब्राम्हण तुफान घेतात. शिकिलकर खरा आहे. अशी डौलांत आणिली होती. निखालस तुटली नवती. ब्राह्मण म्हणों लागले कीं, पंच पैका खाऊन पंचाईत खोटी करितात, आमचा इलाज चालत नाहीं. त्याजवरून शेंदोनशें ब्राम्हण जमून, गारपिरावर येऊन,

१३. 'हाटीकर्ण' पाठभेद.
१४. वानोडे=वानवळे ?.
१५. शिकलकर=शस्त्रें पाजविणारा, शस्त्रशोधक.

खांसे डेऱ्या जवळ दोन प्रहरीं मशाला लावून बसले होते. श्रीमंत जेवून बाहेर आले तों ब्राह्मण यांणीं एकदांच हर हर महादेव ! केला. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, " हे ब्राह्मण कोठील आहेत ? " तेव्हां राजश्री महादाजीपंत साठे होते त्यांस सांगितलें कीं, " यांतून दोन ब्राम्हण पुढें बलावून आणावे." तेव्हां दोन ब्राम्हण बलावून आणिले आणि त्यांस विचारिलें कीं, " तुम्ही कोठें असतां, व दोन प्रहरीं मशाला लावण्याचें कारण काय ? " ब्राह्मण बोलले " आम्हीं दाभाड्याचे तळेगांवास असतों. राज्यांत आंधार पडला म्हणून मशाल लाविली आहे ! " " असा तुम्हांवर जुलूम काय झाला आहे, तें सांगावें " तेव्हां ब्राम्हण बोलले कीं, " आज ब्राम्हणत्व बुडालें. ब्राम्हणाची बायको शिकिलकर मुसलमान याजकडे जात असते. नानांनीं पंचांकडे पंचाईत नेमून दिली आहे, परंतु पंचांनीं शिकिलकर याजपासून पैका खाऊन आमची पंचाईत खोटी करितात. त्यास स्वामींनीं समक्ष बसोन पंचाईत मनास आणावी. आम्ही खोटे जाहल्यास आमचें पारिपत्य करावें." त्याजवरून आज्ञा झाली कीं, " ब्राह्मण कचेरीस डेऱ्यांत ध्यावे." आणि नानांकडे बलावणें पाठविलें. तेव्हां नाना आले. त्यांस सांगितलें कीं, " ब्राम्हणांची पंचाईत तुम्हीं आम्ही बसोन मनास आणावयाची." नाना बोलले कीं, " पंचांकडे पंचाईत नेमून दिली आहे." श्रीमंतांनीं सांगितलें कीं, " त्या पंचांस येथें बोलवावें." त्याजवरून पंचांस बोलाविलें. तेव्हां ब्राम्हण व शिकिलकर व ती बाई अशीं आलीं. चार शास्त्री चार वैदिक चार सावकार मेळवून पंचाईत मनास आणूं लागले. त्यावेळेस पंचाईत आली कीं, शिकिलकर खोटा व ब्राम्हण खरे. अशी पंचाईत आली. बाबा फडके नानांचे पाठीमागे बसले होते. नानांनीं डोळे वटारून बाबांकडे पाहिलें. बाबा पंचांतले म्हणोन बाबा उठोन नानांचे कानाशीं लागले.[१६] नाना पंचांस राखून बोलले कीं, " पंचाईत मनास आणिली होती, परंतु निखालस तुटली नवती; पंचांला जाबसाल उद्यां विचारतां येईल. " अशी त्यावेळेस पंचांची बाजू राखली. सध्यां पंचाईत आली ही खरी.[१७] श्रीमंतांनीं त्या बाईस पुढें बलावून विचारिलें कीं, हे ब्राम्हण काय बोलतात ? तेव्हां बाई कांहींच बोलेनासी झाली. त्यावरून छडया आणावयास सांगितलें. मग बाई कबूल जाहली कीं, मजपासून गोष्ट जाहली खरी. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, आतां काय मनास आणावयाचें आहे ? बाई कबूल झाली. मग यज्ञेश्वर शास्त्री,

---

१६. ' याजपुढें ' बाबा चिरंजीव त्या वेळेस झाले ' असें वाक्य एका प्रतींत ज्यास्त आढळतें.

१७. याजपुढें " असें नाना बोलले " असें वाक्य एका प्रतींत आढळतें.

आपा शास्त्री यांचे बंधु जवळ होते त्यांस विचारलें कीं, "शास्त्रीबावा, पंचाईत कशी झाली ?" तेव्हां त्यांणीं सांगितलें कीं, "पंचाईत वास्तविक झाली." "शिकिलकर व बाईचें पारिपत्य काय करावें ?" तेव्हां कोणी शास्त्री म्हणों लागले कीं, "शिकिलकर याचा शिरच्छेद करावा, आणि बाईस जातींत घ्यावयाची नाहीं, ठार मारावी तर स्त्रीहत्या घडते, किल्ल्यावर ठेवावी तरी परिणाम नाहीं." असें शास्त्री बोलूं लागले. त्याजवरून श्रीमंत बोलले कीं, "या शिकिलकर यास उद्यां दोन प्रहरीं पुण्यांत नेऊन, बुधवारांत कोतवाल चावडीजवळ याचे पांच पाट काढून, गाढवावर बसवून, शहरभर धिंड भोवंडावी आणि हत्तीचे पायाशीं बांधून शहरभर फिरवावा आणि मारून टाकावा. म्हणजे शहरांत दहशत पडेल." याप्रमाणें शिकिलकर याचें पारिपत्य केलें. बाईस राज्यपार करून दिली. ऐशी पंचाईत मध्यें आली ती करणें प्राप्त झाली. मग ब्राम्हण खुशाल होऊन आपले घरीं गेले.

नंतर दुसरे दिवशीं गारपिरावरून कूच होऊन कोरेगांवचे मुक्कामीं गेले. तेथें मोंगल यांचे वकील बरोबर होते, त्याणीं पेशव्यांचे लष्करांत चोर बातमीनें टीप घेतली. यांजबरोबर फौज किती आहे ? तेव्हां हुजुरांत मानकरी पंचवीस हजार व गारदी पंचवीस हजार[१८] व शिंदे यांजबरोबर चाळीस हजार, होळकर यांजबरोबर पंधरा हजार व पांढरपेशे मुत्सद्दी ब्राम्हण यांचीं धोत्रें वाळत घालवयाच्या दांड्या पंधरा हजार होत्या. याप्रमाणें धोत्रें भोजनभाऊ बहुत आहेत. यांणीं तरवार काय मारावयाची आहे ? आपण दर कूच पुढें यावें. असें वकील याणीं खुशालीचें वर्तमान निजाम अल्ली यांजकडे लिहून पाठविलें त्यांजकडे आमचे वकील गोविंदराव काळे, यांणीं तिकडील वर्तमान लिहून पाठविलें कीं, मोंगल यांजबरोबर लाख फौज व चाळीस हजार पठाण लढाऊ तोफखाना व [१९]जनानखाना दीडशें बायका बरोबर होत्या. त्या खेरीज नाटक शाळा ऐशी होत्या[१९]. त्या जनानखान्याच्या अंबाऱ्या ऐशीं बरोबर होत्या. दर अंबारींत बायका दोन दोन यांजबरोबर बेगनी[२०] पलटण सजविलें होतें. याप्रमाणें सरंमजाम होते. म्हणोन वकील यांचें लिहिलें आलें. याप्रमाणें दिनचर्याचें वर्तमान त्यांचे वकिलांनीं तिकडे लिहावें आमचे वकिलांनीं इकडे लिहावें.

पुढें कोरेगांवाहून कूच होऊन [२१]कौंढी तांदळीचे मुक्कामीं गेले, तों तेथें तासगांवकर परशुरामभाऊ पटवर्धन सोळा हजारानिशीं आले. त्यांस सामोरे

---

१८. 'वीस हजार' पाठभेद.

१९–१९. या वाक्यांबद्दल एका प्रतींत "जनानखाना व दीडशें बायका तीनशें लष्कराच्या नबाब यांच्या, पैा दीडशें बायका बरोबर होत्या, खेरीज नाटक शाळ अशा होत्या." अशीं वाक्यें आहेत.

२०. बेगनी=लढाऊ बायकांचें.

२१. "कारंजी तांदळी" पाठभेद.

खांसा स्वारी कोसभर जाऊन भेटले, आणि मोठया समारंभानें जाऊन आणिलें. येऊन उतरले. पुढें तेथून कूच होऊन भिलवाडीचे मुक्कामीं गेले. तों नागपूरवाले रघोजी भोंसले तीस हजारानिशीं आले. त्यांजबरोबर बाणांचा सरंजाम बहुत होता. त्यांस खांसा स्वारी तीन कोसावर सामोरे जाऊन मोठ्या इतमामानें येऊन उतरले. त्याजवरून त्यांचे वकिलांचीं अवसानें गेलीं. त्याणीं नबाब यांजकडे लिहून पाठविलें कीं, "पूर्वीं लिहिलें होतें, फौज पेशव्यांची कांहीं नाहीं. हल्लीं तासगांवकर पटवर्धन व नागपूरवाले भोंसले मिळाले. पन्नास हजारानिशीं येऊन भेटले. फौज बहुत जमत चालली." तेथून कूच होऊन पुढील मुक्कामीं गेले तों हिंदुस्थानांतून शिंदे यांची फौज सरदार जिवबादादा व लखोबा नाना शेणवी होते त्यांजबरोबर फौज पंचवीस हजार[22] व कंपु दोन, नळी बेवीस हजार व तोफखाना तीनशें या प्रमाणें सरंजाम होता. त्यास खांसा स्वारी कोसभर सामोरे जाऊन भेटले. मोठ्या सन्मानानें येऊन उतरले. बाजार बुणगे सुद्धां दोन लाख फौज जमली. या शिवाय लहान मोठे सरंजामी बहुत येऊन भेटले, ते कोठवर लिहावे ?

दुसरे दिवशीं त्याचे वकिलांस बोलावून जिवबा दादाकडून बैलदबाराची[23] कवाईत करविली. तीनशें तोफांचा व बेवीस हजार कंपु नळीचा पांच आंख मोजीत तों एकदांच आवाज होई. या प्रमाणें चार घटीका कवाईत करविली. नबाब यांचे वकिलांस दाखविली. वकील यांचीं अवसानें गेलीं. वकील ह्मणो लागले कीं, 'या आगी पुढें कोण ठरेल! याजवरून वकील याणीं निजामअल्ली यांजकडे लिहिलें कीं, तुम्हीं पुढें येणें तें विचार करून येणें. तिकडील मश्रुलमुलूख यांचे दिवाण यांस बहुत गर्व जाहला होता. ते म्हणो लागले कीं, "पेशव्यांची फौज किती आहे ती आधीं पाहून घेऊं. तेथून बालेघाटाचे सुमारें येऊन उतरले होते. हे ज्या मुक्कामीं होते, तेथून कूच होऊन सिनानदी आहे तेथें मुक्कामास आले. तो मुलूख मोंगल यांचे सरदार रावरंभा निंबाळकर परांडेवाले यांजकडे होता. आपला मुलूख पाठीं मागें टाकून त्यांचे मुलुखांत गेले. निजाम अल्ली मोंगल पेशवे यांस वीस कोसांचें अंतर राहिलें. इतकें जवळ येऊन ठेपले. तेथून सिनानदीवरून दुसरे दिवशीं कूच करून विंचरणा नदीवर जाऊन उतरले. त्याला व यांला देहा[24] कोशांचें अंतर राहिलें. तेथें आठ दिवस मुक्काम जाहले.

२२. 'वीस हजार' पाठभेद.
२३. 'जथ, जप' पाठभेद.
२४. 'दोन' पाठभेद.

एके दिवशीं शिंदे व होळकर यांसि बलावून विचारलें कीं, " तुमचे बरोबर पेंढार किती आहे ? " तेव्हां ते बोलले कीं, पंचवीस हजार आहेत. त्याचे सरदारांस बलावून सांगितलें कीं, आमची पेशव्यांची पूर्वापार चाल अशी आहे कीं, अगोदर त्यांचे मुलखांत व त्याचे आमचे भंवताला दोनशें कोसांत आपला मुलूख खेरीज करून दिवा मिळूं नये. याप्रमाणें हुकूम झाला. पेंढार याचे सरदारांस सोन्याचीं कडीं व पोषाख दिले, आणि त्यांस सांगितलें कीं, तुम्हांस लूट माफ आहे. मग पेंढार यांणीं मोठीं मोठीं शहरें अवरंगाबाज व पैठण व जालनापूर व दुसरीं कितीक शहरें व मुलूख जाळून लुटून फस्त केला. दोनशें कोसांत दिवा नाहीं. मग त्यांजकडे कोठून रसद येईल ! आधींच पेंढार आणि त्यांत हुकूम झाला, मग काय विचारावयाचें आहे !

एके दिवशीं बाबा फडके तलाव्यास बाहेर पांच चार कोसावर गेले होते. तेथें निजाम अल्ली मोंगल यांची कही घांटाखालीं होती त्या कहीच्या बरोबर स्वार रखवालीस पांच हजार होते. व बावांबरोबर पांच चारशें स्वार होते. त्यांची व यांची वाटेनें गांठ पडली. त्या वेळेस बाबा फडके पळाले. तेव्हां फडके यांची दहा पांच घोडीं कहीवाल्यांनीं धरून नेलीं. त्यांजबराबर स्वार भारी होते. त्यांणीं मागें जाऊन मश्रूल मुलूख यांजपाशीं खुशालीचें वर्तमान सांगितलें, " हरिपंत तात्याका बेटा तो भाग गया. याजप्रमाणें पेशवे यांची फौज आहे. " त्याजवरून मश्रूल मुलूख यांणीं खुशालीचें वर्तमान ऐकून तोफखाना सोडला व साखरा वाटल्या. आणि रात्रीं आमचे गोविंदराव काळे यांस बलावून भांडांचा तमाशा केला. सोंगें बहुत आणिलीं. कशीं म्हणाल तरि नाना फडणीस व दौलतराव शिंदे व परशराम भाऊ अशीं नांवें घेऊन सोंगें आणिलीं. आमचे वकिलास दाखविलीं. आणि बोलले याप्रमाणें पुढें व्हावयाचें. असें आमचे वकिलास सांगितलें. चार प्रहर तमाशा जहाला. गोविंदराव काळे वकील आपले डेऱ्यांत जाऊन पत्रें श्रीमंतांकडेस लिहिलीं. तमाशाचें वर्तमान लिहिलें. तीं पत्रें श्रीमंतांकडेस आलीं. गोविंदराव काळे यांचे दिवाण गोविंदराव पिंगळे इकडे नानाकडेस होते, त्यांणीं पत्रें श्रीमंत व नानांस वाचून दाखविलीं.

मग नानांनीं थोरला डेरा दळबादल म्हणोन होता तो उभा करविला. त्या डेऱ्यांत पांच हजार मनुष्यें बसत असा होता. तिसरे प्रहरीं सगळे मानकरी शिंदे, होळकर, भोंसले, पटवर्धन यांस बोलावून कचेरी जहाली. तेथें वकि-

२५. रसद=दाणा वैरणीचा पुरवठा.

२६. तलावा=पर्यटण, टेहळणी, लढाईच्या कामा साठी भोंवतालच्या प्रदेशाची पाहणी करणें.

२७. कही=दाणा वैरण आणणारी टोळी.

त्यांचीं पत्रें आलीं होतीं, तीं राजश्री त्रिंबकराव परचुरे यांस सांगितलें कीं, पत्रें सगळे मानकरी यांस मोठ्यानें वाचून दाखवावीं. त्याप्रमाणें त्यांणीं वाचिलीं. सर्वांनीं वर्तमान ऐकलें. मग श्रीमंतांनीं दौलतराव शिंदे व भोंसले यांची मस्करी केली, " पत्रें ऐकतां, पुढें विचार काय करावा ? निजाम अल्ली व मश्रूल मुलूख याणीं अशीं सोंगें आणूं नयेत तीं आणिलीं." मग शिंदे यांणीं विनंती केली कीं, " आम्ही आजपर्यंत स्वारी केली नाहीं. पाटीलबावा यांचा लौकिक. आमची पहिली स्वारी, परंतु महाराजांचे प्रतापें करून काय मौज होईल ती पहावी." याप्रमाणें विनोद केला. बहुत हास्य केलें. राजश्री परशरामभाऊ पटवर्धन बाजूस बसले होते, त्यांस बलावून सांगितलें कीं, " स्वारीचें ओझें तुमचे डोकीवर आहे. या मध्यें पोक्त मोठे तुम्हीच आहां, तुम्ही डोई दिल्याशिवाय पल्ला येणार नाहीं." मग भाऊंनीं विनंती केली कीं, " शिंदे, होळकर, भोंसले असे मोठमोठे आहेत, व आम्हीही पाठीमागें आहोंच." मग नाना बोलले कीं, " दोन टोळ्या केल्या पाहिजेत, आमचे तर्फे भाऊ तुम्ही व बाबा फडके असे नेमावयाचे." मग शिंदे यांस विचारलें कीं, " तुम्ही आपले सरदार कोण नेमितां ?" त्यांणीं सांगितलें कीं, " आमचे तर्फेनें जिवबादादा व लखोबा नाना." मग भोंसले यांस विचारलें, " तुम्ही आपले सरदार कोण नेमितां ?" तेव्हां त्यांणीं सांगितलें कीं, " आमचे तर्फेनें विठ्ठलपंत सुभेदार." होळकर यांणींही आपले तर्फेनें एक दोन सरदार नेमिले. नाना ह्मणाले तुम्ही खाशांनीं श्रीमंताजवळ असावें. पुढें सड्या फौजांनिशीं लढाई करावी. मग खाशांवर पाळी येईल. आणि पोतनीस यांस बोलावून सांगितलें कीं, " पोषाख आणावे." परशराम भाऊंस शेला, पागोटें, शिरपेंच, कंठी, व तुरा दिला. जिवबादादा व लखोबा नाना व विठ्ठलपंत सुभेदार व होळकरांकडील सरदार यांस याप्रमाणें पोषाख दिले. हे मोठमोठे मोहरे होते. वरकड मानकरी यांस विडे दिले. आणखी सांगितलें कीं, आपले गोटांतून सड्या फौजा निवडून बाबा फडके पुढें पांच चार कोसांवर जाऊन पूर्वींच उतरले होते; कारण छापा येईल; असें समजोन चवदा हजार हुजुरात मानकरी होते तेथें जाऊन उतरावें ह्मणोन सांगितलें. बरोबर बाजारबुणगें घेऊं नये. लढाईस सड्या स्वारीनिशीं जाऊन उतरावें. सडी फौज लढाईस पुढें किती गेली ह्मणाल, तर साठ हजार होती. जेथें भाऊंची उडी पडेल तेथें साठ हजारांची उडी पडावी. याप्रमाणें सांगितलें. इतक्यांचा मोड होईल तेव्हां मग खाशांवर पाळी येईल. मग दोन टोळ्या केल्या. खासे अवघे श्रीमंतांपाशीं राहिले.

त्याजवरून दुसरे दिवशीं निजामअल्ली बालेघाटा खालीं उतरून आले, तेथें

सं. नं. २०५

एक दोन दिवस झाले. तेथून परांडा किल्ला बारा कोस होता. त्या किल्ल्यांवर त्यांणीं बहुत सरंजाम केला होता. निंबाळकर यांजकडे किल्ला होता. जसे आमचे शिंदे, होळकर मोठे सरदार, तसे निंबाळकर त्यांचे सरदार. त्यांचा बेत तेथून कूच करून परांड्याचे रोखें जावें. किल्ला पाठीमागें घालून तोंड द्यावें. आपल्यास किल्ल्याचा आश्रय आहे. पेशवे यांस पाठीमागें कांहीं आश्रय नाहीं. याप्रमाणें बेत होता. वकील यांणीं श्रीमंत यांस बातमी लिहिली, उद्यांचा दिवस जाऊन परवां येथून कूच करून परांड्याचे रोखें जाणार त्यास तुम्हीं परवां तेथून घाला घालावा. परांड्याचे रोखें जाऊं देऊं नये. याप्रमाणें पत्रें आलीं. तीं नानांनीं वाचून पाहून श्रीमंतांकडेस दाखविलीं आणि परशराम भाऊंकडे पाठविलीं कीं, याप्रमाणें परवांचा बेत राखावा. त्याजवरून भाऊंनीं पत्रें वाचून पाहून दुसरे दिवशीं संध्याकाळीं तमाम सगळ्या गोटांत ताकीद केली कीं, उद्यां पहांटेची प्रहर चार घटिका रात्र आहे तों स्नानसंध्या भोजन करून दिवस उदय पावत आहे तों सर्वांनीं तयार असावें. सगळ्या लष्करांत जिकडे तिकडे तयारी होत आहे, कोणी जीनबंदी करीत आहे, कोणी भाकरी खात आहे, तों इतक्यांत तिकडून बातमी आली कीं, निजामअल्ली कूच करून चालते झाले. बरोबर सरंजाम भाकरींच्या कंठाळ्या घोड्यांवर भरल्या, पाण्याच्या पखाला उंटावरून घेतल्या, बाजार बुणगे मध्यें घालून मोठ्या आराम्यानें चालले. त्याचें चालणें मिजाशी बहुत, दिवसांतून चार कोस म्हणजे भारी. याप्रमाणें मिजाशी. इकडे परशराम भाऊ यांचें खास पथक आठशें स्वारांची तयारी जाहली होती. बाकी फौज तयार होत होती भाऊंचे. लेंक दोघे बरोबर होते, आपा व बाबा. पुतण्या विठ्ठलपंत सुभेदार होते ते पुणें मुक्कामीं भाऊंस म्हणत होते कीं, "तुम्हीं सर्वांस पालख्या दिल्या आणि मजला पालखी कां नाहीं?" मग भाऊ बोलले कीं, "तरवार मारावी आणि पालखी मेळवावी!" तोही विठ्ठलपंत बरोबर होता. मग भाऊंनीं सगळ्या गोटांत सांगून पाठविलें कीं, आम्ही पुढें तलाव्यांस जातों, तुम्ही मागाहून लौकर यावें.

याप्रमाणें सांगोन आठशें स्वारांनिशीं भाऊ चालते जहाले. खरड्याचे आलीकडे तीन कोस घोडेगांव होता, तेथें लहानशी टेंकडी होती त्याजवरून चढोन खालीं लवणांत निजामअल्ली कूच करून जात होता. त्याजला व यांजला कोसा सवाकोसाचें अंतर राहिलें. भाऊंनीं दुरबीण लावून

२८. "बहुत सरदार लोक ठेविले होते." पाठ भेद.

२९. "दिवस घटकाभर येई तों तयार झालें पाहिजे" पाठभेद.

३०. तलावा=टेहळणी-मागें टीप २६ पहा.

त्यांचे लष्करांत पाहिलें तों इतक्यांत त्यांची कांहीं दहापांच हजार फौज पुढें घाढली होती. ती त्या डोंगरीचे आड होती ती भाऊंचे दृष्टीस पडली नाहीं. भाऊंनीं बाजूस पाहिलें तों जवळ टोळी देखिली; तों भाऊ बोलले कीं ही फौज कोणाची आहे? तेव्हां समजलें कीं; गनीमाची आहे. ते पुढें आल्याची बातमी होती कीं, परशरामभाऊ म्हणतात ते पुढें आले आहेत. भाऊंची टोळी थोडकी पाहून त्यांणीं पुढें चाल केली. मग भाऊ म्हणों लागले कीं मागें पळावें तरी ठीक नाहीं आणि आमच्या फौजा अजून आल्या नाहींत. तेव्हां भाऊंनीं सांडणी स्वार मागें जलद पाठविला कीं, तुम्हीं लौकर यावें. आमचें लढाईचें तोंड लागलें. मग भाऊ घोड्यावरून खालीं उतरून श्रीमंतांस साष्टांग नमस्कार घातला आणि बोलले कीं, आतां महाराजांचे पाय समर्थ आहेत. इतकें बोलून घोड्यावर स्वार झाले, आणि दोन हातींचे पट्टे उघडे केले, आणि घोडा पुढें घातला. इतक्यामध्यें गलीमाचे पांचचारशें स्वार पुढें येऊन तेथें हातघाई जुंपली. भाऊंचे ४०० स्वार पडले व त्याचें ५।४ शें. तों इतक्यांत भाऊंचा पुतण्या विठ्ठलराव याणें घोडा पुढें घातला. आणि दोन पठाण मोठे ठार मारिले. आणि मागें परतला तों तिकडून गोळी आली ती उरावर लागली. लागतांच घोड्यावरून खालीं पडला तो ठार जाहला. हें पाहून भाऊंचे चिरंजीव आप्पा होते, त्यांणीं घोडा पुढें घालून विठ्ठलराव याचा मुर्दा उचलून पालखींत घालून मागें पालखी रवाना केली. जीवंत मेला पाहिला नाहीं. मोहरा गनीम नेईल म्हणोन जलदी केली. तों तिकडून दहापांच पठाण येऊन एकानें भाऊंवर हात टाकिला. तो डोळ्यावर जखम जाहली. दोघे चिरंजीव बाबा व आप्पा यांणीं भाऊंवर हात टाकिला त्या पठाणास ठार मारिला. तों इतक्यांत भाऊ शंभर स्वारानिशीं राहिले. बाकी स्वार पडले. तिकडून बाबा कूच करून जात होते, ते लढाईचें तोंड लागतांच तेथेंच राहिले. इकडे भाऊंचें अवसान गेलें. तों इतक्यांत मागाहून विंचूरकर यांचें पथक व निळकंठराव रामचंद्र परभू पागे होते त्याचें पतक आलें. आणि विंचूरकर यांचे बरोबर चारशें स्वार होते त्यांस बातमी लागतांच धांवत आले, आणखीं म्हणों लागले कीं, भाऊ कोठें आहेत ! मग भाऊ बोलले कीं, तुमचा बाप होऊन पुढें उभा राहिला आहे. मग असे रागानें बोलले कीं, तुम्हांस यावयास एवढा उशीर काय ! मग तीं दोन्ही पतकें पुढें सरून लढाई बहुत केली. त्याजकडील लालखान पठाण सरदार मोठा होता, तो हत्तीच्या हवद्यांत बसून तिरंदाजी करीत होता. हत्ती ठेंगणा होता. विंचूरकर यांजकडील बारगीर सिपाई तरवार मारणारा चांगला होता, त्यानें घोडा पुढें घालून हत्तीच्या आंगाशीं

११. घाढली होती=पुढें आली होती.

भिडोन, हत्तीच्या हवद्यांतील लालखान पठाण खांसा मोहरा पाडिला. तों इतक्यांत त्यांजकडील वजीरखान पठाण सरदार मोठा होता, तो पुढें दहापांच स्वारानशीं धांवत आला. त्याजवर निळकंठराव रामचंद्र प्रभू हा पुढें जाहला. आणि वजीरखानास ठार मारिलें. मोठे मोहरे त्यांजकडील दोन पडले, व आमचा मोहरा एक विठ्ठलपंत पडला. इतक्यांत बाबा फडके दहाबारा हजारांशीं येऊन पोंचले. व जिवबादादा व लखोबानाना व विठ्ठलपंत सुभेदार सगळे फौजानिशीं येऊन पोंचले. हें पाहून त्याजकडील असगूलखांनें सरदार लढत होता तो परतला- पहिली हातघाई तों मागें परतला आणि गोट जेथें थांबला होता तेथें गेला तेव्हां राहिली तोफांचे तडक्यास बारा पंधराशें मुर्दा पडला.

मग जिवबादादा यांणीं तीनशें तोफांचा खटारा पुढें लाविला, आणि बेवीस हजार नळी पळटणाची उभी राहिली. एक बाजूस हुजुरात मानकरी उभे राहिले. व एक बाजूस विठ्ठलपंत सुभेदार बाणांचा सरमजाम घेऊन उभे राहिले. दिवस सकाळचा सहा घटिका आला. मग तोफा तोफांची लढाई लागली. मग तिकडून गोळे इकडे येऊं लागले व इकडून गोळे तिकडे जाऊं लागले. एकच तडाका तोफांचा उसळला. संध्याकाळचा दिवस सहा घटिका राहिला, एकच मारा जाहला. इतक्यांत त्यांजला वारा सोईचा होता धूर आमचे लष्करांत येऊं लागला. मग भाऊ बोलले कीं, वारा जर कृपा करील तर बरें आहे. मग भाऊंनीं श्रीमंतांचें स्मरण करून वाऱ्याची प्रार्थना केली कीं, महाराजांचें पुण्य आहे तर तूं कृपा कर. असें म्हणतात एक दोन घटिकेंत वारा तिकडे फिरला. धूर इकडे येत होता तो तिकडे जाऊं लागला. मग भाऊंस अवसान आलें. मग भाऊ म्हणों लागले कीं, वाऱ्यानें कृपा केली आतां भीत नाहीं. मग राजश्री सखारामपंत पानसे यांस पुढें बलावून सांगितलें कीं, थोरल्या तोफा तोफखान्याच्या पुढें आणाव्या. पलटणी तोफांनीं काम होत नाहीं. मग सखारामपंत पानसे यांणीं सत्तरी तोफा पुढें ओढिल्या. त्या तोफा बहुत मोठया होत्या. एक एक तोफेस बैल दोनशें ओढावयास लागत अशा होत्या. त्या तोफा सुरू होत तों अस्तमान जाहला. मग त्या तोफा सुरू जाहल्यावर दणाण झाला. तिकडे अस्तमान होतांच मशाला लागल्या. हवयांचा उजेड पुढें बहुत पडला. मग विठ्ठलपंत सुभेदार-यांणीं बाणांचें छत करून सोडिलें. आणि जशी परजन्य वृष्टी होते, त्याप्रमाणें बाणामागें बाण सोडून एकच मार केला. आणि सर्वांनीं एकदांच हरहर महादेव ! करून एकदांच उडया घातल्या. मोठी लढाई मातबर जाहली. अशी रात्र प्रहर होई तों

३२. याजबद्दल 'अदलीखान' असेंही आहे.

३३. 'स्वतंत्र' पाठभेद.

मोठी ख्याती लढाईची जाहली. जिवबादादा यांणीं मोठी मर्दुमी केली. माणसें पडलीं त्याची संख्या त्या वेळेस राहिली नाहीं. आमचे तर्फेने गोविंदराव काळे वकील तिकडे होते, त्यांणीं नबाब यांचे लष्करांत फितूर केला. पठाण चाळीस हजार पुढें तोंडावर लढत होता, तो फितूर होतांच पठाण मागें पाय घेऊं लागले वाय बार करूं लागले. मग नबाब यांणीं पाहिलें कीं, आपले लष्कारांत फितूर दिसतो, पठाण तुटून पडत नाहींत. असें पाहून जरिपटका नबाब यांणीं फिरविला. निजामअल्ली याची बुद्धि फिरली. श्रीमंतांचें दैव थोर म्हणोन, ईश्वरीअवतार ह्मणून त्या वेळेस यश आलें. नबाब मागें फिरतांच मश्रूलमुलूख दिवाण पुढें तोंडावर त्यांणीं मागें पाहिलें तों खासे फिरले, जरिपटका फिरला. हें पाहून मश्रुलमुलूख फिरले, आणि पळत चालले. आमची फौज अंगावर मारीत चालली तों दोन कोस अंगावर गेली. तोफखाना त्यांचा लुटून आणिला; पेंढारी यांणीं त्याजकडील घोडे, राऊत, थकले असें पाहून शेले पागोटीं लुटून घेऊं लागले. पेंढार यांणीं एकच घाई केली. नबाब यांणीं मागें जाऊन खरड्याच्या गढींत खासे शिरले. आणि जासुदाबरोबर चिठ्ठी पाठविली कीं, " रावपंडित प्रधान जय असे. लढाई महकूब करावी. आम्ही तहाचें बोलणें लावितों, तुम्हीं जें मागाल तें देतों, शरण आहों. " याप्रमाणें जासूद, सांडणीस्वार व भालदार बोलावयास आले. मग भाऊ बोलले कीं, हल्ला करून लुटून घ्यावें, पहातां काय ? तों इतक्यांत गोविंदराव काळे वकील त्यांजकडे होते, त्यांणीं चिठ्ठी लिहिली कीं, " नबाब शरण आले त्यांस मरण द्यावयाचें नाहीं. यांचा आपला भाऊपणा आहे. यांणीं या समयास आपल्यावर स्वारी करूं नये. बरें असो. तुम्हीं लढाई महकूब करावी करीत नसल्यास शिक्के कटार पाठवितो." याप्रमाणें लिहिलें वकील यांचें आलें. मग भाऊंनीं लढाई महकूब केली. तो इतकियांत दुसरी चिठ्ठी वकील यांची आली कीं, " लढाई महकूब करविली खरी, परंतु नबाब हे रोखून बसले आहेत. रात्रीं लढाई महकूब करून सकाळीं पुन्हा लढाईचें तोंड द्यावें असा बेत दिसतो. आपल्यास पाणी नाहीं. डोहो पाण्याचा त्यांणीं राखिला आहे. त्याजकडे सांगून पाठवावें कीं, तुमच्या मनांतून सल्ला करावयाचा असल्यास पाणी आमचें स्वाधीन करावें. नाहीं तरि आतांच हल्ला या वेळेस करितों. " असें सांगून पाठविलें. तों त्याजवरून तो अडला. रात्रीचा विषय पडला. म्हणोन त्यांणीं आपली फौज पाण्यावरून उठविली. मग आमचा कंपू पाण्यावर जाऊन उतरला. मग भाऊंनीं फौजेच्या चार टोळ्या करून त्यांची फौज मधीं घालून उतरले. नबाब खासे मात्र गढींत शिरले होते, फौज दरोबस्त बाहेर होती. नबाब यांचे बरोबर चारण यांचे बैल चाळीस-

हजार दाण्यांनीं भरलेले होते, ते पेंढार यांणीं लुटून पेशव्यांच्या लष्करांत आणिले. त्यांस दाणा व पाणी नाहीं. लोटाभर पाणी निजामअल्ली यांचे लष्करांत द्यावें आणि एक रुपया घ्यावा व शेरभर पीठ द्यावें आणि रुपया घ्यावा. अशी याप्रमाणें त्यांची अवस्था केली. नबाब यांचें तहाचें बोलणें लागलें. तों प्रातःकाळ जहाला.

परशरामभाऊ यांचा पुतण्या विठ्ठलपंत सकाळचे सहा घटिका दिवसास लढाईंत पडला, व भाऊंस जखम लागली त्या वेळेस भाऊंनीं हातचिठ्ठी नानाकडे मागें लिहून पाठविली कीं, " आमचा गळाठा फार आहे, स्वारीची गोष्ट कठीण दिसती." मग नानांनीं चिठ्ठी पाहून नानांचेंही अवसान गेलें. नानांनीं लौकर भोजन करून, प्रस्थान बरोबर घेऊन, सरकारचे व नानांचे मध्यें डेरा पेंठे यांचा होता, तेथें प्रस्थान देऊन सरकारचे डेऱ्यास आले. तों श्रीमंत जेऊन उठावयास जहाले होते, इतक्यांत नाना आले. मग देवघरचे राहुटींत गालीच्या टाकून श्रीमंत व नाना व आपा बळवंत व गोविंदराव पिंगळे असे तेथें बसले. आणि नानांनीं भाऊंकडील चिठ्ठी आली होती ती श्रीमंतांस दाखविली, आणि विनंती केली कीं, "येतांना पेंठ्यांचे डेऱ्यास प्रस्थान ठेवून निघोन आलों आहों. पुढें सड्या स्वारींत जावयाची आज्ञा असावी. कारण भाऊंचा गळाठा बहुत आहे, म्हणोन जावयाचें." हें बोलणें नानांचें ऐकोन श्रीमंत बोलले कीं, पुढें जाण्याचें कारण काय ? संध्याकाळपर्यंत गलिमाचा फडशा होतो, न जाहला तर तुम्ही व आम्ही बरोबरच जाऊं. पुढें जावयाचें कारण पडत नाहीं. संध्याकाळ पर्यंत स्वारी फत्ये होती, संशय नाहीं." महाराजांचें उत्तर ऐकोन नानांनीं विनंती केली कीं, " आपण बोलत नाहीं, भगवान् गोपाळ कृष्ण बोलत आहेत ! आपण ईश्वरी अवतार आहांत. आपल्या मुखांतून निघेल तें प्रमाण." नानांचे मनांतून पुढें जावयाचें नव्हतें, परंतु महाराजांचे मुखांतून काय निघतें तें पहावें. मग श्रीमंत व नाना कचेरीच्या डेऱ्यांत जाऊन बसले. तों इतक्यांत शिंदे व होळकर व भोंसले खासे अवघे श्रीमंताजवळ येऊन बसले. अवघ्यांच्या डांका सांडणीस्वारांच्या होत्या. घटिके घटिकेची बातमी कळत होती. संध्याकाळ जाहला. मग शिंदे व होळकर व भोंसले जेवावयास जावयाचा निरोप मागूं लागले, मग श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, " आज निरोप कोणास द्यावयाचा नाहीं. खाशांनीं अवघ्यांनीं आमचे पंक्तीस जेवावयास रहावें. खाशी मंडळी पंक्तीची असेल ती निवडून बाकी फौजेस निरोप द्यावा. शेवट पर्यंत काय वर्तमान लढाईचें येईल तें पाहूं, नाहीं तर याच पायीं पुढें जाऊं." मग खांशी मंडळी पाहिली तों

सहाशें असामी खासे मात्र राहिले. मग वांकनीस यांस बलावून सांगितलें कीं, स्वयंपाक लवकर करावा. मग वांकनीस यांनीं दहा, पांच आचारी लाऊन स्वयंपाक करविला. तों रात्र सहा घटिका जहाली. नंतर भोजन होऊन कचेरीस बैस्यांत आले. तों रात्र दहा घटिका जाहली. तों इतक्यांत लष्करचें खुशालीचें वर्तमान अकरावीचे अमलांत बाबा फडके यांचा सांडणीस्वार घेऊन आला. फडके यांणीं चिठी लिहिली कीं, "नबाब कोसभर मागें हटले. आम्ही आंगावर मारीत चाललों आहों. पेंढार यांनीं त्यांची खराबी बहुत केली." हें खुशालीचें वर्तमान ऐकून सांडणीस्वारास सोन्याचीं कडीं व पोषाख बक्षीस दिला. पुढें तेरावीचे अमलांत जिवबा दादा यांचा सांडणीस्वार खुशालीचें वर्तमान घेऊन आला. जिवबा दादांनीं चिठ्ठी लिहिली कीं, "निजामअल्ली दोन कोस मागें हटले. आणि त्यांचा तोफखाना आम्हीं लुटून आणिला आहे. स्वारी फत्ते आहे." हें ऐकोन सांडणीस्वारास शेराचें कडें सोन्याचें बक्षीस दिल्हें, व पोषाख दिल्हे. पुढें पंधरावीचे अमलांत परशराम भाऊ यांचा सांडणीस्वार खुशालीचें वर्तमान घेऊन आला. भाऊंनीं सकाळची चिठ्ठी गलबलीची लिहिली होती, व हल्लीं खुशालीची चिठ्ठी लिहिली कीं, "तीन कोस निजामअल्ली मागें हटून खर्ड्याच्या गढींत शिरले, आम्ही आंगावर मारीत गेलों, व तेथें फौजेच्या चार टोळ्या करून त्यांची फौज मध्यें घालून सभोंवता वेढा देऊन उतरलों. नबाब यांचें तहाचें बोलणें लागलें आहे. स्वारी फत्ते आहे." याप्रमाणें चिठ्ठी पाहून घेऊन सांडणीस्वार भाऊंचा आला होता, त्या स्वारास सोन्याचीं कडीं दोन व पोषाख बक्षीस दिल्हा. मग नानांनीं वांकनीस यास हाक मारून सांगितलें कीं, "साखरेचीं पोतीं आणून साखरा वाटाव्या, व तोफखानाही सोडावा." म्हणोन हुकूम जाहला. मोठी खुशाली जाहली. मग सगळे खासे उठोन निजावयास गेले.

तिकडे निजामअल्ली यांजकडून तहाचें बोलणें लागलें होतें त्यांनीं बोलतां बोलतां चार दिवस धीर धरिला. त्यांचे लष्करांत घोडा व माणसें पांच हजार महर्गता म्हणून मेलीं. शेरभर पीठ व लोटाभर पाणी रुपयाचें. मग त्याचे सरदार त्यास बोलूं लागले कीं, "तुम्ही लढाई करा अथवा तह करा आणि ते मागतील तें द्या, परंतु असे आम्हांस अन्नापाण्याविरहित कां मारितां?" असें त्यांचे सरदार त्यांस बोलूं लागले. मग नबाब यांणीं आमचे वकील गोविंदराव काळे यांस बलावून विचारिलें कीं, "तुमची मर्जी काय घ्यावयाची आहे तें बोलावें. किंवा आम्हांस लुटून घ्यावयाचें असल्यास लुटून घ्यावें" मग गोविंदराव काळे यांणीं उत्तर केलें कीं, "श्रीमंतांकडेस लिहून पाठवितों आज्ञा

होईल त्याप्रमाणें सांगूं." मग श्रीमंतांकडे काळे यांणीं पत्र लिहिलें आणि पाठवून दिलें कीं, "नबाब यांचें बोलणें असें पडलें आहे, तर यास उत्तर काय द्यावें!" मग श्रीमंतांनीं उत्तर इकडून पाठविलें कीं, निजामअल्ली यांचा व आमचा पूर्वापार घरोबा आहे. त्यांनीं आम्हांवर स्वारी करूं नये. आमची कमती पाहिली म्हणोन आम्हांवर स्वारी केली. बरें असो. घरोबा पूर्वापार आहे तोच आहे. आम्हांस स्वारीखर्च पांच कोटी जाहला आहे तो द्यावा, व पांसष्ट लक्षांची जाहागिरी, व दौलताबाद किल्ला आमचा घेतला आहे तो द्यावा व मश्रुलमुलूख तुमचे दिवाण आहेत त्यांस द्यावें. या प्रमाणें त्यांस सांगावें म्हणून वकील यांजकडे लिहून पाठविलें. त्या प्रमाणें वकील यांणीं नबाब यांस उत्तर दिलें. मग नबाब फिरून वकिलापाशीं बोलले कीं, "आणखी ही मुलूख पाहिजे असल्यास घ्यावा, व पैकाही आणखी घ्यावा, परंतु आपला दिवाण आपले हातीं कसा द्यावा?" या प्रमाणें बोलले. त्याजवरून वकील यांणीं पुन्हा नानांकडे लिहून पाठविलें कीं, नबाब यांचें बोलणें असें आहे. मग नानांनीं वकिलास उत्तर लिहिलें कीं, "मश्रुलमुलूख यास घेतल्या शिवाय ऐकावयाचें नाहीं. आम्हांस पैका व मुलूख जाजती नको, परंतु मैनात-दवला यास द्यावा म्हणोन त्यास सांगावें." त्या प्रमाणें वकील यांणीं पुन्हा त्यास उत्तर सांगितलें. मग नबाब उगीच राहिले. आणि मनामध्यें खिन्न जाहले. नंतर दुसरे दिवशीं रात्रीस नबाब व मश्रुलमुलूख यांचें चार प्रहर खलबत जाहलें. मश्रुलमुलूख नबाब याजपाशीं बोलले कीं, "आम्हांस घेतल्या शिवाय श्रीमंत ऐकत नाहीं, तरि आम्ही आतांच जातों. आम्ही जावयास राजी आहों. तुमचे घरची दिवाणगिरी व पेशवे यांचे घरचा बंदी-खाना बरोबर होणार नाहीं. ते पांढरपेशे ब्राह्मण आहेत, ते आमचा सन्मान असाच राखतील. तुम्हीं आम्हांस द्यावयास अनमान केलें असतां, तुम्हांस जाऊं देत नाहींत. दौलत बुडते. करितां असें करूं नये. सध्या तुम्ही आपली वेळ काढून घ्यावी." या प्रमाणें दोघांचें बोलणें होऊन एकमेकांचे गळ्यांत हात घालून श्रमी झाले. आणि दुसरे दिवशीं गोविंदराव काळे यांस सांगितलें कीं, "मश्रुलमुलूख यांस देतों. आणखीं कांहीं मागावयाचें असल्यास मागावें." मग वकील बोलले कीं, "पांच कोटी रुपये व जाहागिरी पांसष्ट लक्षांची व किल्ला दौलताबाद व मश्रुलमुलूख यांस द्यावें." या प्रमाणें वकील यास सांगितलें. ते द्यावयास कबूल जाहले.

मग नानांनीं राघोजी गुडेव व राघोपंत गडबोले येथून पाठविले. त्यांणीं निजामअल्ली याजकडे जाऊन पांच कोटीची सावकारी निशा घेतली, व जहागिरी सनदा व किल्ला दौलताबाद परत घेतला व मश्रुलमुलूख यांणीं आपल्या बायका

बरोबर व पांच चार कोटीची दौलत व दोन हजार फौज बरोबर घेऊन लष्करांतून बाहेर निघाले. तेव्हां राघोपंत गडबोले यांणीं मश्रुलमुलूख यास सांगितलें कीं, "एवढे फौजेनिशीं यावयाचा हुकूम नाहीं दोनशें स्वारांनिशीं चलावें" मग त्याणीं अवघी फौज माघारीं फिरविली आणि दोनशें स्वार बरोबर घेऊन निघाले. मग नाना फडणीस आपण एकटेच चार कोश मश्रुलमुलूख यांस सामोरे गेले. तेथें उभयतांच्या भेटी जाहल्या, व चार घटिका खलबत जाहलें. मग नानांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं, "आपण खासा स्वारी अघाडीचे ढाले परियंत पुढें यावें. त्या प्रमाणें पुढें श्रीमंत आले. नानाही तिकडून मैनातदवला यास घेऊन पुढें आले. गोळीच्या टप्यांत आले तेव्हां मश्रुलमुलूख याची अंबारी उभी केली. त्यास तेथें अंबारींतून खालीं उतरून गोविंदराव बापू यांणीं त्याचा हात धरून चालत आणिलें. त्यांणीं डोकीचा रुमाल सोडून हातावरून गुंडाळून धरून आणिला. श्रीमंत यांचे अंबारीजवळ येऊन उभे राहिले. मग श्रीमंत अंबारींतून खालीं उतरून उभे राहिले. आणि आपा बळवंत यास सांगितलें कीं, "मैनातदवले यांस भेटावें आणि हातांत काय आहे किंवा काय तें पहावें." मग आपा जाऊन मैनातदवले यास आवळून धरून भेटले. हातांत पाहिलें तों कांहींच नाहीं. मग श्रीमंत यांणीं हाताशीं हात लावून सलाम केला. आणि श्रीमंत आपले अंबारींत जाऊन बसले. आणि वकील यास सांगितलें कीं, मैनातदवला यास माघारा न्यावा आणि अंबारींत बसवावा. इतकें सांगून स्वारी चालती झाली. मागाहून दोनी अंबाऱ्या नानांची व मश्रुलमुलूख याची अशा दोन अंबाऱ्या बरोबर चालत्या झाल्या. तमासगीर लष्करांत मिळालेले होते, ते मश्रुलमुलूख याचे तोंडावर बोलूं लागले कीं, "भला धरून आणिला, ठीक जहालें." तमासगीर यांचें काय करावयाचें आहे ? बरें असो. मश्रुलमुलूख याचा दरोबस्त चेहरा उतरोन गेला. स्वारी कचेरीच्या डेऱ्यांत आली. बैठक जाहली. तेथें त्याचा बहुत सन्मान केला. सगळे खासे मानकरी होते. मैनातदवला याचे पागोट्यावर गुलाबपाणी टाकिलें व अत्तर लाविलें व गळ्यांत हार घातले व हातांत गजरे व पागोट्यांत तुरे लाविले. पेशवे यांणीं त्यांचा सन्मान-बहुत केला. परंतु त्यांजला संतोष नव्हे. त्यांणीं मान खालीं घातली होती. भवंतालीं कोण बसलें हें त्यांणीं पाहिलें नाहीं. मग नानांनीं फरासखान्याचे दरोग्यास बलावून आणून सांगितलें कीं, मैनातदवला यास सरमजाम तयार करावा. काय सरमजाम तरि डेरे, राहुटी व बिचवा व लाकर्दी तयार करावी. तेव्हां मश्रुलमुलूख बोलले कीं, आमचा सरमजाम बरोबर आहे. कोठें आज्ञा होईल तेथें डेरे उभे करितों. मग नानांनीं डेरे उभे करावयास सांगितले. त्याजवरू-

न त्यांणीं डेरे उभे केले. मग तेथून मश्रुलमुलूख उठोन डेऱ्यास जाऊन उतरले. मग नानांनीं बजाबा शिरोळकर यांस सांगितलें कीं, तुमचें पतक जाऊन मैनातदवला याचे डेऱ्यास उतरावें. तुमचे हुकुमाशिवाय आंतील कोणी बाहेर जाऊं नये, व बाहेरील आंत जाऊं नये., याप्रमाणें सांगितलें. मग बाहेरून नानांनीं सरमजाम मिठायी व शाखभाजी पाठवून दिली. मग दुसरे दिवशीं नबाब याजकडून घाशिमिया म्हणोन होता, तो बोलणारा आला. त्याणें येऊन श्रीमंतांस विनंती केली कीं, "नबाब यांणीं सांगितलें आहे कीं, तुमच्या आमच्या भेटी असाव्या. कारण असा जो रावपंडितप्रधान दैववान् पुरुष आहे तो दृष्टीनें पहावा कीं, या मागें आम्ही पेशव्यांवर स्वाऱ्या बहुत केल्या, परंतु असा दैववान् पुरुष कधींच पाहिला नाहीं, आमचे लष्करांत लोटाभर पाणी रुपयाचें, व शेरभर पीठ रुपयाचें, व आपला दिवाण आपले हातीं द्यावा, असा कधीं आमचा मोड जाहला नाहीं. तरि असा दैववान् पुरुष आहे त्याच्या व आमच्या भेटी असाव्या. नानासाहेब यांचा नातु तो आमचा नातु." हें घाशिमिया याचें बोलणें ऐकून नानांच्या मनांतून भेटी करावयाच्या नवत्या. कां म्हणाल तर, हा पुरा शत्रु, भेटीमध्यें गलबल करील. भेटी नाहीं असे म्हटलें तर भ्याले असें म्हणतील. त्यांस काय उत्तर द्यावें. तेव्हां नानांनीं मार्फत योजिली कीं, "तुमच्या आमच्या भेटी व्हावयाच्या, परंतु तुम्ही पाच्छाई चाकर व श्रीमंतांस पाच्छायाची वजीरी व नालखी व माहीमरातब आला आहे. तुमचें व आमचें बरोबरीचें नातें पडलें. तुम्ही आमचे डेऱ्यास यावें व आम्ही तुमचे डेऱ्यास यावें असें व्हावयाचें नाहीं. तुम्ही चार कोस पुढें यावें व आम्ही चार कोस पुढें यावें आणि तुमच्या आमच्या भेटी व्हाव्या. परंतु शिंदे, होळकर आमचे बाजूस, हे तुम्हांस कांहीं सामोरे येणार नाहींत, त्यापेक्षां यांला ठेवून यावें हें ठीक नाहीं. तुमच्या आमच्या भेटी जहाल्या एवढ्याच. तुम्हीं आम्हांस मेजवानी पोषाख पाठवून द्यावे, व आम्हीं तुम्हांस मेजवानी पोषाख पाठवून द्यावे, परस्पर भेटी व्हाव्या." याप्रमाणें घाशिमिया यास सांगितलें. मग घाशिमिया मागें जाऊन, नबाब याजपाशीं उत्तर सांगितलें. तेव्हां नबाब बोलिले कीं श्रीमंतांचे मनांत भेटावयाचें नाहीं, म्हणून पर्याय सांगितला. मग नबाब यांणीं मेजवानी पोषाख पेशवे यांजकडे पाठविला. मग पेशवे यांणीं नबाब याजकडे मेजवानी पोषाख पाठवून दिला.

मग दुसरे दिवशीं नानांनीं श्रीमंतांस विनंती केली कीं, सरदारांचा समाचार घेतला पाहिजे. त्याजवरून श्रीमंत व नाना प्रातःकाळीं भोजन करून स्वारी तयार करून, भोंसले यांजकडील विठ्ठलपंत सुभेदार यांचे डेऱ्यास पहिल्यानें गेले. विठ्ठलपंत यांस शाबासकी बहुत दिली कीं, लढाई फार चांगली केली. वि-

ठ्ठलपंत यांचे गोटांत शिपाई कोण मेला व कोण जखमी जाहला. हें श्रीमंतांनीं विचारिलें. त्यास विठ्ठलपंत यांणीं सांगितल्याप्रमाणें मनास आणून बक्षीस दिलें. चार घटका बैठक जाहली. नंतर स्वारी तेथून निघून जिवबादादा शिंद्याकडील, त्याचे डेऱ्यास आले. जिवबादादा व लखोबानाना या उभयतांची पाठ थापटून शाबासकी दिली. "तुम्ही तरवार बहुत चांगली केलीत," अशी स्तुती केली, त्यांणीं सांगितल्याप्रमाणें त्यांच्या गोटांत कोण पडला व कोण जखमी जहाला, तें मनास आणून बक्षीस दिलें. जिवबादादा यांणीं मेजवानी निरशनाची फराळाची बहुत तरतूद केली होती त्यांणीं महाराजांस विनंती केली कीं "आज परियंत निरशन उपोषण करीत असतों, आमचें पारणें अद्याप जाहलें नाहीं. तरि महाराजांनीं आज येथें निरशनाचा फराळ करावा म्हणजे उद्या पारणें होईल." मग श्रीमंत नानांस बोलले कीं, "शेणवी आहेत, आम्ही कसें रहावें !" मग नानांनीं विनंती केली कीं, "आपले ब्राम्हण आचारी यांणीं फराळाचें केलें आहे. त्यास शेणवी असले म्हणून काय चिंता आहे. ? जिवबाची मर्जी मोडावयाची नाहीं. त्यांणीं तरवार फार चांगली केली. सरदाराची अडचण अशीच पाळावी लागते." मग श्रीमंत फराळास उठले. जिवबादादाचे आग्रहास्तव एक हस्त बतासा तोंडांत टाकिला. मग जिवबादादा बोलिले कीं, आमचा हेतु पूर्ण जाहला. मग सर्व ब्राम्हण मंडळी बरोबरची त्यांनीं फराळ केला. मग तेथून स्वारी निघोन परशरामभाऊंच्या डेऱ्यास आली. भाऊंचा समाचार घेतला. परशराम भाऊंनीं सांगितलें त्याप्रमाणें कोण जखमी जाहला व कोण पडला होता त्यास बक्षीस दिलें. तों दिवस संध्याकाळचा दोन घटिका दिवस उरला. मग श्रीमंत नानांस बोलिले कीं, दिवस थोडा राहिला, चार कोस मागें जावयाचें आहे. असें बोलत आहेत तों परशराम भाऊंनीं विनंती केली कीं, "स्वारी या वेळेस जावयाची नाहीं. संध्या भोजन येथें होईल मग स्वारी जावी." तेव्हां श्रीमंत नानांचे तोंडाकडे पाहूं लागले आणि बोलिले कीं, "भाऊ सुतकी आहेत कसें रहावें ?" मग विनंती केली कीं, "या समयीं भाऊंची मर्जी मोडावयाची नाहीं. सुतकास पर्याय निघेल." त्याप्रमाणेंच भाऊंनीं डेऱ्याचे तोंडाशीं हात देऊन उभे राहिले आणि विनंती केली कीं, मर्जी असल्यास आम्हांस लोटून द्यावें आणि जावें. मग श्रीमंत बोलिलें कीं, "सुतकास पर्याय निघेल, परंतु आमचे बरोबर शेंपन्नास ब्राम्हण मंडळी आहेत, तितक्यांस तुम्ही भाऊ सड्यास्वारींत असतां रात्रींचीं सोवळीं, भांडीं कशीं मिळतील." मग भाऊंनीं विनंती केली कीं, "सोवळीं मिळतात किंवा नाहीं तें स्वामींनीं पहावें." या प्रमाणें विनंती केली, तों इतक्यांत अस्तमान झाला, मग श्रीमंत संध्या करावयाक-

रितां उठले. ते देवघरच्या राहुटींत गेले. आणि पाहूं लागले तों भाऊंनीं कशी तरतूद केली आहे. शंभर पाट सागवानी एकसारखे मांडिले आहेत व तांब्यापंचपात्री दरएक पाटास मांडिली आहे व केळीचीं पानें समग्र मांडिलीं आहेत व प्रत्येक पाना पुढें समया तेवत्या आहेत व कोरे पितांबराची घडी दर पाटास ठेविली या प्रमाणें शंभर पाटावर पितांबराच्या घड्या ठेविल्या. या प्रमाणें भाऊंची तरतूद पाहून श्रीमंत बोलिले कीं, "तुम्ही सड्या स्वारींत असतां एवढी तरतूद कशी केली?" मग हें ऐकून भाऊंनीं विनंती केली कीं, "महाराज आपले कृपेकरून शंभरसे काय, स्वामींचे पाय लागले येथें काय कमती? हजारों निर्माण होतील. आमची शक्ती काय आहे? स्वामींचे पायाचा प्रताप हा!" मग श्रीमंत ही तरतूद पाहून खुशाल जाहले, आणि भाऊंस शाबासकी दिल्ही. मग संध्या होऊन श्रीमंत व नाना व मंडळी सुद्धां भोजनास बसले. भाऊ निराळे बसले, पंक्तींत बसले नाहींत. श्रीमंत भोजनास राहिले म्हणोन भाऊ खुशाल जाहले, आणि बोलूं लागले, "आम्ही सुतकी असतां महाराज भोजनास राहिले. आणखी बक्षीस काय मेळवावयाचें आहे!" पुतण्या मेल्याचें दुःख भाऊ विसरून गेले. मग श्रीमंतांनीं जेवतांना बहुत मस्कऱ्या भाऊंच्या केल्या व हास्य केलें. मग भोजन करून विडासुपारी घेऊन स्वारी आपले डेऱ्यास जावयास आले. तों रात्र मध्यान जाहली. पुढें* दोहों चहूं दिवशीं भाऊंचें दोहों सुतक फिटोन मश्रुलमुलूख यास बरोबर घेऊन सगळे खासे मानकरी सुद्धां स्वारी पुण्यांत आले. नबाब तिकडे चालते जाहले. स्वारी दिवस मावळल्या नंतर सगळ्या शहरांत चिरागा लाऊन हवया, नळे, चंद्रजोती लाऊन स्वारी रस्त्यानें मिरवत चालली होती. लोकांनीं आपल्या वाडयांवरून खांशा अंबारीवर सोन्याचीं व रूप्याचीं फुलें उधळलीं. तो फुलांचा पेर रस्त्यांत पडला होता. दोन लाख फौज बरोबर लाख घोडा व लाख पायदळ व दीडसें अंबारी व दीडसें खुला हत्ती एकूण तीनसें हत्ती बराबर स्वारी पुढें चालत होते. त्या दिवशीं लोकांस असा भास जाहला कीं, भगवान् गोपाळकृष्ण यांची स्वारी चालली आहे असा भास जाहला. स्वारी बहुत शोभली. मोठ्या समारंभानें वाडयास आली. सगळे मानकरी शिंदे, होळकर, भोंसले, पटवर्धन व दुसरे सरदार होते तीं नांवें किती लिहावीं? सर्वांस कंठ्या शिरपेच व दुसरे पोषाख बक्षीस दिले. आणि मेजवान्या केल्या आणि सर्वांस निरोप दिल्हे. याप्रमाणें श्रीमंतांचा जय झाला.

भाऊंचें सुतक फिटलें. हैदराबादचे कित्येक लोक देशमुख व देशपांडे व कुळकर्णी व पाटील व नाडगौड असे पांचशें असाम्यांची वतनें लांच खाऊन

---

* रा॰ विष्णु गोविंद चिपळोणकर यांणीं बडोद्याहून मुक्रराच या बखरीच्या दोन प्रती पाठविल्या त्यापैकीं एकींत येथपासून मजकूर निराळा आहे तो पुढें दिला आहे.

खालसांत करून त्याबद्दल पैसा दोन लक्ष रु. निजामअल्ली वृत्ति उत्पन्नाबद्दल पन्नास साठ वर्षेपर्यंत सरकारांत घेत होते. त्याची दाद कोठें लागेना. तेव्हां त्यांनीं तेथेंच श्रीमंतांपाशीं सर्वांनीं अर्ज केल्यावरून श्रीमंतांनीं निजामअल्लीस ताकीद देऊन सर्वांचीं वतनें मोकळीं करून दिलीं. आणि सर्वांचे उत्पन्न साठ वर्षांचे निजामअल्ली याचे खजिन्यांतून एक कोट वीस लक्ष रुपये हे सर्वांचे ज्याचे त्यास हिसेरसी प्रमाणें देविले. आणि निजामअल्ली यास ताकीद दिल्ही, पुन्हा ह्या लोकांचा बोभाट येतां उपयोग नाहीं. बोभाट[आल्यास] पुन्हा स्वारी होईल अशी ताकीद देऊन सर्वांचा संतोष केला. त्याबद्दल वतनदार लोक पांच लक्ष रुपये नजराणा देत असतां श्रीमंतांनीं घेतला नाहीं. सबब त्यांणीं दाणा व घांस दोन लक्ष फौजेची चंदी पुण्यापर्यंत आम्ही सरकास पुरवितों एव्हढी विनंती आमची मान्य करावी ; असें बोलून हात जोडून उभे राहिले, तेव्हां श्रीमंतांनीं नानांकडे पाहिलें. तेव्हां नाना बोलले, बरें आहे, तजवीज ठेवावी. नंतर सर्वांनीं मिळोन पुण्यापर्यंत स्वारीचा बंदोबस्त ठेविला. पुढें स्वारी पुण्यास दाखल जाल्या उपरांत सर्वांस शेला पागोटीं देऊन सर्वांचा मान ठेवून सर्वांस निरोप दिल्हा. या प्रमाणें सवाई माधवराव राज्यावर बसल्यावर हापसान देशांत व बारस देशांत व फिरगाण लोक व जळमार्गाचे लोक इतक्यांपासून दरसाल खंडण्या त्यांच्या राज्याचे योग्यतेनुरूप घेऊन मांडलीक सर्व करून ठेविले. या प्रमाणें दिल्ली अटके पर्यंत सर्व लोक सुखी करून ठेविले. या प्रमाणें खरड्याची स्वारी श्रीमंतांनीं केली. मशरउल्मुलुख यास बरोबर घेऊन सगळे मानकरी सुद्धां निघोन पुण्यास आले. तिकडेस चालते झाले. स्वारी अस्तमान जाहल्यानंतर शहरांत आली. नंतर शहरांत चिरकदान्या, हावया, नळे, चंद्रज्योति, स्वारी रस्त्यांतून मिरवत चालली. व लोकांनीं आपआपल्या ओटयांवरून खाशा अंबारींत सोन्याचीं फुलें उधळिलीं. पायदळीं रस्ते सर्व फुलांनीं भरले होते. दीडलाख[?] दीडशें आंबारीचे हत्ती खुले. एकून हत्ती स्वारी बरोबर चालत होते. त्या दिवशीं लोकांस असा भास वाटला कीं श्रीकृष्ण गोपाळ भगवान् याची स्वारी शोभली. मोठ्या समारंभानें स्वारी वाड्यांत आली. सगळे मानकरी शिंदे, होळकर व भोसले व पटवर्धन व विंचूरकर असे बहुत होते ते किती ल्याहावें. शिरपेंच कंठ्या व तुरे शेले पागोटीं बक्षीस दिलें. मेजवानी केली. नंतर सर्वांनीं [स?] निरोप दिले. येथें खरड्याची बखर समाप्त झाली. ही बखर पठण करील त्यास विद्या लक्ष्मी प्रसन्न होईल. तुम्ही मनांत संशय घेऊं म्हणाल तर श्रीमंत मनुष्य होते असें म्हणाल तरि जो पृथ्वीचा पति आहे. तो विष्णूचा अवतार आहे यांत संशय नाहीं. श्रीकृष्णार्पणमस्तुः हरयेनमः सीताराम रावजी गणपत्ये दस्तुर खुद्द मित्ती मार्गशीर्ष वद्य ४ रोज शुक्रवार संवत् १९३५.